## नियमित दिवाणी दावा क्र. ४७६/२०१६ मध्ये निशाणी क्र. ४३ कडील अर्जावर आदेश.

१) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीतर्फे त्यांच्याविरुध्द निशाणी क्र. १ वर दिनांक ०३/१२/२०२४ रोजी पारीत करण्यात आलेला पुरावा बंदचा आदेश रद्द करुन प्रस्तुत प्रकरणात पुरावा देण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) प्रस्तुत अर्जास वादीचे म्हणणे घेण्यात आले आहे. वादीतर्फे प्रस्तुत अर्जास दिलेल्या निशाणी क्र. ४७ कडील म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, अर्जात कोणतेही योग्य अगर संयुक्तिक कारण नमुद केलेले नाही. प्रतिवादी हा दावा लांबविण्याचा प्रयत्न करत आहे व त्यामुळे अर्ज नामंजुर करावा.

३) प्रस्तुत अर्जाच्या कामी दोन्ही पक्षातील विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४) दोन्ही पक्षातील विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला असता व रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रस्तुतचे प्रकरण प्रतिवादीच्या पुराव्याकरीता निश्चित केले असताना प्रतिवादीने त्यांचा पुरावा दाखल न केल्यामुळे प्रतिवादीचा पुरावा बंद करण्यात आल्याबाबत दिनांक ०३/१२/२०२४ रोजी निशाणी क्र. १ वर आदेश पारीत केला आहे. त्यानंतर प्रतिवादीने प्रस्तुत अर्ज त्याच दिवशी दाखल केला आहे. माझ्या मते प्रतिवादीला त्यांचा पुरावा सादर करण्याची संधी देऊन प्रस्तुत प्रकरण गुणवत्तेच्या आधारे

निकाली काढणे न्यायाचे व उचित आहे. त्यामुळे वरील नमूद कारणांमुळे माझ्या मते न्यायाच्या दृष्टीने प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो व त्यानुसार निशाणी क्र. ०१ वर दिनांक ०३/१२/२०२४ रोजी प्रतिवादीविरुध्द पारीत केलेला पुरावा बंदचा आदेश रद्द करुन प्रतिवादीला त्यांचा पुरावा सादर करण्यास परवानगी देण्यात येते.

२) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2025.01.16 15:12:49 +0530

(पां. लिं. घुले)

दिनांक– १५/०१/२०२५ २रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.